सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक २१(२) ] सोमवार, ऑगस्ट २, २०१०/श्रावण ११, शके १९३२ [ पृष्ठे ३, किंमत रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**—मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . . . . | पृष्ठे १-३ |

दिनांक ३१ जुलै २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २ ऑगस्ट २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

## मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९२३ चा मुंबई १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील,— १९२३ चा मुंबई १.

(१) खंड (क) मध्ये,—

(एक) उप-खंड (पाच) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (पाच-अ) किंवा इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणी सेवा उपलब्ध करून देण्यासाठीचे लायसन असणारी, एखादी भागीदारी संस्था, निगम निकाय किंवा कंपनी अधिनियम, १९५६ याखाली नोंदणी केलेली कंपनी ; " ; १९५६ चा १.

(दोन) उप-खंड (आठ) मधील " नृत्य-बारच्या " या मजकुराऐवजी " नृत्य बार, प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेली परमिट रूम किंवा बिअर बार, पब यांच्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) खंड (ई-ई.१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ई-ई. २) " इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणी " याचा अर्थ, ज्या इंटरनेट प्रोटोकॉल सेवा पुरवठाकारांना आपल्या ग्राहकांना प्रसारमाध्यमांचे कार्यक्रम प्रक्षेपित करण्याचे अधिकार आहेत, त्यांनी इंटरनेट प्रोटोकॉल जोडण्यांच्या मदतीने दूरध्वनी जोडणीमार्फत केलेले दूरचित्रवाणी वाहिन्यांचे प्रसारण, असा आहे ; " ;

(३) खंड (फ-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (फ-२) " प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेली परमिट रूम किंवा बिअर बार " याचा अर्थ, जेथे मद्य पुरविण्याबरोबरच मनोरंजनासाठी कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष संगीताचा कार्यक्रम आयोजित केला जातो अशी कोणतीही परमिट रूम किंवा बिअर बार, असा आहे आणि त्यात या सर्वांचा समावेश होतो ; " ;

(४) खंड (ग-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ग-ग.१) " पब " याचा अर्थ, जेथे मद्य पुरविण्याबरोबरच मनोरंजनासाठी कोणत्याही प्रकारचा संगीताचा कार्यक्रम आयोजित केला जातो अशी कोणतीही परमिट रूम किंवा बिअर बार, असा आहे आणि त्यात या सर्वांचा समावेश होतो ; ".

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील,—

(क) " केबल दूरचित्रवाणीच्या " या मजकुरानंतर " किंवा इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीच्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) " नृत्य बार, " या मजकुरानंतर " प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेली परमिट रूम किंवा बिअर बार, पब, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ग) खंड (ब) मध्ये,—

(एक) " केबल दूरचित्रवाणी (टेलिव्हिजन) द्वारे, " या मजकुरानंतर " इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणी द्वारे, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) " नृत्य बार, " या मजकुरानंतर " प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेली परमिट रूम किंवा बिअर बार, पब, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मधील, " केबल दूरचित्रवाणीमार्फत " या मजकुरानंतर " किंवा इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीमार्फत " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (११) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (११अ) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेल्या अशा परमिट रूम किंवा बिअर बार मधील करमणुकीच्या बाबतीत, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क आकारण्यात येईल आणि वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेल्या प्रत्येक परमिट रूमच्या किंवा बिअर बारच्या मालकाकडून प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत ते राज्य शासनाकडे आगाऊ देण्यात येईल :—

**तक्ता**

| अनु-क्रमांक | क्षेत्र | प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेल्या परमिट रूम किंवा बिअर बारबाबत करमणूक शुल्काची मासिक रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | सर्व महानगरपालिकांच्या हद्दीत. | ५०,०००. |
| २ | नोंद १ मध्ये समाविष्ट नसलेली इतर सर्व क्षेत्रे. | २५,०००. "; |

(४) पोट-कलम १७ मध्ये,—

(अ) " डिस्कोथेकच्या " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुरानंतर, " किंवा पबच्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) तक्त्यातील अनुक्रमांक २ वरील नोंदीनंतर, पुढील नोंदी जादा दाखल करण्यात येतील :—

| | |
|---|---|
| " ३. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील,— | |
| (क) पंचतारांकित हॉटेलमधील पब ; | २,००,०००. |
| (ख) पंचतारांकित हॉटेलमध्ये असलेल्या पब व्यतिरिक्त इतर जागांमधील पब. | १,००,०००. |
| ४. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील,— | |
| (क) पंचतारांकित हॉटेलमधील पब ; | १,००,०००. |
| (ख) पंचतारांकित हॉटेलमध्ये असलेल्या पब व्यतिरिक्त इतर जागांमधील पब. | ५०,०००. ". |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ३०(२)] सोमवार, ऑगस्ट २, २०१०/श्रावण ११, शके १९३२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ६१

प्राधिकृत प्रकाशन


महाराष्ट्र विधानमडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Entertainments Duty (Amendment) Act, 2010 (Mah. Act No. XXII of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT NO. XXII OF 2010.

*[ First published, after having received the assent of the Governor, in the " Maharashtra Government Gazette ", on the 2nd August 2010].*

An Act further to amend the Bombay Entertainments Duty Act, 1923.

Bom. I of 1923. WHEREAS it is expedient further to amend the Bombay Entertainments Duty Act, 1923, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

Short title. **1.** This Act may be called the Bombay Entertainments Duty (Amendment) Act, 2010.

Amendment of section 2 of Bom. I of 1923.

2. In section 2 of the Bombay Entertainments Duty Act, 1923 (hereinafter referred to as " the principal Act "),— Bom. I of 1923.

(1) in clause (c),—

(i) after sub-clause (v), the following sub-clause shall be inserted, namely :—

" (v-a) or a partnership firm, body corporate or a company registered under the Companies Act, 1956, having licence to provide Internet Protocol Television service ;"; 1 of 1956.

(ii) in sub-clause (viii), after the words " dance bar, " the words " permit room or beer bar with live orchestra, pub, " shall be inserted ;

(2) after clause (e-e1), the following clause shall be inserted, namely :—

" (e-e2) " Internet Protocol Television " means broadcasting of television channels through telephone network with the help of Internet Protocol network by the Internet Protocol Service Providers who have right to transmit media-programming to their customers ; " ;

(3) after clause (f-1), the following clause shall be inserted, namely :—

" (f-2) " permit room or beer bar with live orchestra " means and includes any permit room or beer bar where along with serving of liquor, any type of live music is performed for entertainment ;" ;

(4) after clause (g-1), the following clause shall be inserted, namely :—

" (g-g1) " pub " means and includes permit room or beer bar where along with serving of liquor, any type of music is performed for entertainment ; " .

Amendment of section 3 of Bom. I of 1923.

3. In section 3 of the principal Act, —

(1) in sub-section (1),—

(a) after the words " cable television," the words " or Internet Protocol Television," shall be inserted ;

(b) after the words " dance bar, " the words " permit room or beer bar with live orchestra, pub, " shall be inserted ;

(*c*) in clause (*b*),—

(*i*) after the words " cable television, " the words " Internet Protocol Television, " shall be inserted ;

(*ii*) after the words " dance bar, " the words " permit room or beer bar with live orchestra, pub, " shall be inserted ;

(2) in sub-section (*4*), after the words " cable television attached to it " the words " or through Internet Protocol Television " shall be added ;

(3) after sub-section (*11*), the following sub-section shall be inserted, namely :—

" (*11A*) Notwithstanding anything contained in clause (*b*) of sub-section (*1*) or in any other provisions of this Act, there shall be levied and paid in advance, by the tenth day of every calendar month, by the proprietor of every permit room or beer bar with live orchestra, the entertainment duty in respect of entertainment in such permit room or beer bar with live orchestra, to the State Government, at the rates specified in the Table below :—

TABLE

| Serial No. | Area | Amount of entertainment-duty in permit room or beer bar with live orchestra, per month (in rupees) |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Within the limits of all Municipal Corporations. | 50,000. |
| 2 | All other areas not covered by entry 1. | 25,000."; |

(4) in sub-section (*17*),—

(*a*) after the word " discotheque ", at both the places where it occurs, the words " or pub " shall be inserted ;

(*b*) in the Table, after entry at serial No. 2, the following entries shall be added, namely :—

| | | |
|---|---|---|
| " 3. | Within the limits of *Brihan Mumbai* Municipal Corporation,— | |
| | (*a*) pub in the Five Star Hotel ; | 2,00,000. |
| | (*b*) pub situated at a place other than the Five Star Hotel. | 1,00,000. |
| 4. | Outside the limits of *Brihan Mumbai* Municipal Corporation,— | |
| | (*a*) pub in the Five Star Hotel ; | 1,00,000. |
| | (*b*) pub situated at a place other than the Five Star Hotel. | 50,000.". |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.